# कंपनी

सादरकर्ते-
आहेर नंदा बाळासाहेब
सहा.प्राध्यापक
वाणिज्य विभाग

# कंपनी

- कंपनी या शब्दाचा साधा अर्थ म्हणजे एकसमान उद्दिष्टांसाठी एकत्र आलेल्या व्यक्तींचा समूह. कंपनीशी व्यापारी संघटनेचा एक महत्वाचा प्रकार म्हणून ओळखले जाते, तसेच याला संयुक्त भांडवल मंडळ असे म्हटले जाते.
- कंपनी कायद्यानुसार नोंदलेली असते तसेच तिचे कायदेशीर रित्या अस्तित्व असते. कंपनीवर कायदेशीर रित्या काही हक्क, कर्तव्य आणि जबाबदाऱ्या असतात.

# व्याख्या

कायद्यानुसार स्थापन झालेल्या आणि नोंदणी केलेली कंपनी किंवा तत्पूर्वीच्या कंपनी कायद्यानुसार स्थापन झालेली व अस्तित्वात असलेली कंपनी किंवा कायद्यानुसार विविध प्रकारच्या स्थापन झालेल्या कंपन्या उदाहरणार्थ. भागाने मर्यादित कंपनी, हमीने मर्यादित कंपनी आणि अमर्यादित **कंपनी**.

# कंपनीची वैशिष्ट्ये

- एखादी कंपनी कायद्यानुसार नोंदणी झाली तरच ती अस्तित्वात येत असते.
- कायद्याप्रमाणे कंपनीचा अन्वयार्थ एक व्यक्ती म्हणूनच केलेला आहे.
- कंपनीचे सभासद म्हणजेच भागधारक वैयक्तिक रित्या केलेल्या व्यवहार कंपनीला बांधून ठेवू शकत नाहीत. तसेच सभासद स्वतः कंपनीशी करार करू शकतात. ते कंपनीचे कर्मचारी ही असू शकतात.
- कंपनीचे व्यवस्थापन हे संचालक मंडळ, पूर्णवेळ संचालक, व्यवस्थापकीय संचालक किंवा व्यवस्थापक करत असतात. त्यामुळे कंपनीचे सर्व सभासद व्यवस्थापनात सहभागी होऊ शकत नाहीत.

- कंपनीचा सीमित असा कालखंड नसतो. कंपनीचा सभासद मरण पावल्यास किंवा त्यावर कर्जाचा डोंगर झाल्यास याचा कंपनीच्या व्यवहारावर काही विपरीत परिणाम होत नाही.
- कंपनीला स्वतःचे असे नोंदणी केलेले कार्यालय असते.
- भागधारकांची जबाबदारी ही सर्वसाधारणपणे मर्यादित स्वरूपाचे असते.
- कंपनीला स्वतःला मूलभूत अधिकार नसतात.

# कंपनीचे प्रकार

- सरकारी कंपनी (government company information in marathi) – यामध्ये कंपनीचे व्यवस्थापन, कार्य, कर्मचारी आणि नियंत्रण सरकारच्या ताब्यात असतात. यामध्ये समभाग खरेदी करून आपण त्यात हिस्सा खरेदी करू शकतो. उदाहरणार्थ. भारतीय संचार निगम लिमिटेड (BSNL)
- खासगी कंपनी (private limited company information in marathi) – यामध्ये कंपनीचे व्यवस्थापन, कार्य, कर्मचारी आणि नियंत्रण कंपनीच्या मालकाकडे असतात. यामध्ये समभाग खरेदी करून आपण त्यात हिस्सा खरेदी करू शकतो. उदाहरणार्थ. वोडाफोन आयडिया प्रायव्हेट लिमिटेड (VI

- **पब्लिक लिमिटेड कंपनी:**

हा एक सार्वजनिक कंपनीचा प्रकार असून, यामध्ये कंपनीच्या मालकांचे संख्या ठरलेली नसते. कंपनीचे मालक किंवा भागधारक कंपनीच्या संचालकाची निवड करतात. या कंपनीच्या शेवटी लिमिटेड हा शब्द वापरणे बंधनकारक असते. उदाहरणार्थ. इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड.

# सभासद संख्येवरून कंपन्यांचे प्रकार-

- **१. एकल कंपनी (One Person Company) :**
- अशा तऱ्हेच्या कंपनीची रचना अलीकडेच केली गेली. भविष्याचा वेध घेणारी, मागणी असलेली नवनिर्मिती अथवा सेवा याचे कंपनीत रूपांतर करता यावे या उद्देशाने याची रचना करण्यात आली आहे. खाजगी फर्मपेक्षा वेगळी अशी याची रचना असून त्याचे स्वतंत्र कायदेशीर अस्तित्व आणि मर्यादित उत्तरादायित्व आहे.
- **२. खाजगी कंपनी (Private Company):**
- दोन किंवा अधिक व्यक्तींनी एकत्र येऊन कायदेशीररीत्या तिची स्थापना केलेली असते. यातील भागभांडवलाचे खरेदी विक्री व्यवहार कोणत्याही शेअरबाजारात होत नाहीत किंवा खाजगिरीत्या कोणास देता येत नाहीत.

- **३. सार्वजनिक कंपनी (Public Limited Company):**
- सात किंवा त्याहून अधिक लोकांनी एकत्र येऊन उत्पादन किंवा सेवा देण्याच्या उद्देशाने, हिची स्थापना येते. याच्या भागभांडवलाची मान्यताप्राप्त शेअरबाजारात नोदणी करता येऊ शकते, त्यामुळेच त्याच्या भागांचे हस्तांतरण कोणालाही करता येते. सभासद संख्येचे बंधन नसल्याने तिचे कितीही सभासद असू शकतात. अनेक सवलतींमुळे या कंपनीस मोठ्या प्रमाणावर भांडवल उभारणी करता येते. या कंपनीच्या उपकंपनीसही सार्वजनिक कंपनी असेच म्हणतात.

# उत्तरादायित्वावरून कंपन्यांचे प्रकार:

- **१. समभागांच्या मर्यादेत उत्तरादायित्व असलेली कंपनी (Company limited by Shares):**
- या प्रकारातील सभासदाचे उत्तरादायित्व हे तिच्या घटनेतील भांडवलाच्या मर्यादेत असते.
- **२. वैयक्तिक हमीच्या मर्यादेतील उत्तरदायित्व असलेली कंपनी (Company limited by Guarantee):**
- यातील सभासदांचे उत्तरदायित्व हे त्यांनी हमी घेतलेल्या मर्यादेत असून कंपनीच्या मालमत्तेत उत्तरादायित्व असते. या काळात जरी त्या कंपनीचे अस्तित्व संपले तरी हमी दिलेल्या मर्यादेएवढे सभासदाचे उत्तरादायित्व राहील.

- **३. अमर्याद हमी असलेले उत्तरादायित्व असलेली कंपनी (Unlimited Company):**
- अशा प्रकारच्या कंपनीतील सभासदाचे उत्तरादायित्व हे कोणत्याही मर्यादेशिवाय असून जोपर्यंत तो कंपनीचा सभासद आहे तोपर्यंत कायम असते.

# विशेष कंपनी प्रकार:

- **१. सरकारी कंपनी (Government Company):**
- केंद्र किंवा राज्यशासन यांचे स्वतंत्र किंवा संयुक्तपणे ५१% हून अधिक भांडवल असलेल्या कंपनीस किंवा त्याच्या उपकंपनीस सरकारी कंपनी असे म्हणतात.
- **२. परदेशी कंपनी (Foreign Company):**
- परदेशात नोंदलेली परंतु भारतात परंपरागत अथवा आधुनिक पद्धतीने व्यवसाय करणाऱ्या कंपनीस परदेशी कंपनी असे म्हणतात.

- **३. विशेष कंपनी (Section 8 Company):**
- धर्मादाय उद्देशाने कलम ८ नुसार स्थापना  झालेल्या कंपनीस विशेष कंपनी म्हटले जाते. वाणिज्य, शास्त्र, खेळ, कला, संशोधन, शिक्षण, परिसर, धर्म या उद्देशाने या कंपन्या स्थापन झाल्या असून नफा मिळवणे हा त्यांचा हेतू नसतो, त्यामुळे यांच्या भागधारकांना लाभांश मिळत नाही.
- **४. सार्वजनिक वित्तसंस्था (Public Financial Company):**
- अर्थकारणास गती मिळावी आणि भांडवली गुंतवणूक वाढावी या हेतूने स्थापन झालेल्या आणि त्यात सरकार किंवा सरकार पुरस्कृत संस्थेचे ५१% हून अधिक भागभांडवल आहे, अशा संस्थेस सार्वजनिक वित्तसंस्था असे म्हणतात. या कंपन्या कंपनी कायद्याच्याखाली किंवा वेगळ्या विशेष कायद्याने स्थापन झाल्या आहेत

# नियंत्रणावरून प्रकार

- **१. नियंत्रित कंपनी (Holding Company):**
- ज्या कंपनीच्या मालकी किंवा संचालनावर अन्य कंपनीचे नियंत्रण असते त्या मूळ कंपनीस नियंत्रित कंपनी असे म्हणतात.
- **२. उपकंपनी (Subsidiary Company):**
- ज्या कंपनीच्या भागभांडवलात ५१% हिस्सा अन्य कंपनीचा असेल त्यास मूळ कंपनीची उपकंपनी असे म्हणतात.
- **३. सहयोगी कंपनी (Associate Company)**
- व्यवसाय वृद्धीसाठी करार करून एकत्रितपणे काम करणाऱ्या किंवा किमान २०% भांडवली सहभाग असणाऱ्या कंपनीस मूळ कंपनीची सहयोगी कंपनी असे म्हणतात.

# आभार